आठवणी (concept map)

या पाठात तुम्ही खालील घटकांचा अभ्यास करणार आहात-

१. चरित्र/आत्मचरित्र या साहित्य प्रकारातील 'आठवणी' या उपसाहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये

२. खालील पाठांचा 'आठवणी' या साहित्य प्रकारानुसार अभ्यास-

२.१ कृष्णाकाठच्या आठवणी – स्थलाशी निगडित असणा-या आठवणी ,भोवतालचा निसर्ग, परिसर, त्या परिसराची वैशिष्ट्ये, परिसराशी निगडीत असलेले मानवी जीवन, चालीरीती, सण ,उत्सव इ., लक्षात राहणारे प्रसंग, घटना व व्यक्ती, या सर्वांचा साहित्यिकाच्या जीवनावर/मनावर संस्कार व परिणाम

२.२ एक वेडा देशभक्त- भारतीय इतिहासातील सोनेरी अक्षरांनी लिहावा अशा दिवसाची आठवण.लेखक वयाने लहान असले तरीही त्या दिवसाच्या मनावर कोरल्या गेलेल्या आठवणींनी भारावून गेलेले चित्रण. त्या दिवसाशी निगडित असणा-या एका व्यक्तीच्या आठवणी, वरवर सामान्य वाटणा-या व्यक्तीचे असामान्यत्व लक्षात येणे, प्रसंगानुरूप असामान्यत्व लक्षात राहणे, त्या व्यक्तीच्या कृती-उक्ती मधून असामान्यत्व चित्रित होणे.

२.३ 'सर' लोकांच्या आठवणी- शिक्षकांची वैशिष्ट्ये चित्रित करणे,विद्यार्थी वयामध्ये झालेल्या संस्कारांचे महत्व आठवणींच्या स्वरूपात चित्रित करणे, मागे वळून पाहताना त्या संस्कारांचे महत्व लक्षात येणे, आपल्या घडणीत ज्यांचा ज्यांचा मोलाचा वाटा आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे,